# शेतकरी संघटक

पाक्षिक

वार्षिक वर्गणी रु. ३०

किंमत १ रुपया २५ पैसे

वर्ष ९ वे | २१ ऑक्टोबर १९९२ | अंक १४ वा


# नेहरूनीती विरुद्ध खुली अर्थव्यवस्था आणि शेतकरी आंदोलन

— शरद जोशी

**शेतकरी संघटनेच्या कार्यकारिणीची बैठक औरंगाबाद येथे दि. १०/११ ऑक्टोबर ९२ रोजी झाली. त्या बैठकीच्या समारोपप्रसंगी श्री. शरद जोशींनी केलेले हे भाषण.**

**कोणत्या आयातीला विरोध**

फ्रान्समध्ये एकदा बीफ (गोमांस) महाग झाल्याने व इंग्लंडमधून बीफ स्वस्त किंमतीने आयात केले तेव्हा तेथील शेतकऱ्यांच्या मनात चीड उत्पन्न झाली. इंग्लंडमधील शेतकरी आपल्या हातातील बाजारपेठ हिसकावून घेताहेत म्हणून त्यांनी इंग्लंडहून आलेल्या बीफच्या ट्रक फ्रान्सच्या रस्त्यांवर त्यांची टायर्स् पंक्चर करून बंद करून टाकल्या व त्यातील गोमांस सडू दिले. परदेशातून येणारा गहू थांबविण्यासाठी फ्रान्सच्या शेतकऱ्यांइतकी अतिरेकी भूमिकासुद्धा आम्ही घेत नाही आहोत. जर का आम्हाला हरभऱ्याची डाळ बनवायला किलोला १२ रु. खर्च येत असेल आणि ऑस्ट्रेलियाचे शेतकरी जर का ती डाळ ७/८ रुपयांमध्ये आम्हाला पुरवत असतील तर त्याची आयात झाली पाहिजे, कारण त्यात भारताच्या ग्राहकाचं कल्याण आहे. आम्हाला जर का डाळ नीट पिकविता येत नसेल, काही का कारणाने असो, तर मग डाळी-ऐवजी आम्ही दुसरं काही तरी पिकवू. म्हणजे, दुसऱ्या देशापेक्षा कमी खर्चात पिकवून कमी किंमतीत विकू शकू असं पीक घेऊ आणि डाळ पिकवणं बंद करू. खुल्या बाजारपेठेचा अर्थच मुळी असा आहे. आयातीला विरोध करतांना आपण डाळीच्या आयातीविषयी काही बोलत नाही, त्याचं कारण असं आहे की आम्ही भाकरी पिठलं खाणारे, डाळरोटी खाणारे पण आमच्याकरता डाळ पिकविण्याचं काम प्रामुख्यानं ऑस्ट्रेलियामध्येच होतं.

आजारपणानंतरच्या चार महिन्यांच्या विश्रांतीनंतर औरंगाबाद येथे शेतकरी संघटनेच्या कार्यकारिणीसमोर खुल्या अर्थव्यवस्थेचा अर्थ, महत्त्व व आवश्यकता समजावून देतांना श्री. शरद जोशी. शेजारी, किसान समन्वय समितीचे अध्यक्ष श्री. विजय जावंधिया व शेतकरी संघटनेचे अध्यक्ष श्री. किशोर माथनकर.

(छायाचित्र : परफेक्ट फोटो स्टुडिओ, औरंगाबाद)

नुकतेच ऑस्ट्रेलियाच्या राजदूतांनी दिल्लीमध्ये मोठा समारंभ घडवून आणला. हरभऱ्याच्या डाळीसाठी, 'हेडले' हा प्रसिद्ध क्रिकेटिअर होऊन गेला त्याच्या नावाने एक हरभऱ्याची जात त्यांनी हिंदुस्थानाकरिता मुद्दाम तयार केली. आणि ती डाळ तिथे बनवून हिंदुस्थानात निर्यात करण्याची त्यांची तयारी झाली आहे. तुम्ही आम्ही जे पिठलं खातो ते प्रामुख्याने ऑस्ट्रेलियातल्या डाळीचचं आहे. गेल्या वर्षीही तेच होतं, त्याच्या गेल्या वर्षीही तेच होतं. तेव्हा अशा तऱ्हेच्या आयातीला विरोध करण्याकरिता शेतकरी संघटना उभी नाही.

आम्ही कोणत्या आयातीला विरोध करतो? गव्हाच्या आयातीला. देशातील किंमत ठरवतांना सरकारने दर क्विंटलला २८० रुपये ठरवली. खुल्या बाजारात त्याची किंमत तीनशे साडेतीनशे रुपये आहे. पण, परदेशातून खरेदी करतांना अमेरिकन शेतकऱ्याला दिलेली सबसिडी लक्षात घेऊनसुद्धा दर क्विंटलला ५८० रुपये देऊन गहू खरेदी केला जात असेल तर हे चुकीचे आहे. कारण हे खुल्या बाजारपेठेच्या तत्त्वाच्या विरुद्ध आहे. अमेरिकेनं जर असं ठरवलं की हिंदुस्थानचे शेतकरी २८० रुपयात गहू विकतात तर आम्ही त्यांना दीडशे रुपयांत पाहिजे तितका गहू पिकवून देतो, तर आम्ही त्याचं स्वागत करू. कारण, या देशातल्या गरीबाचं त्यात कल्याण होईल. तुम्ही गहू पिकवायला लागा आम्ही गव्हाऐवजी द्राक्षं पिकवू. इस्त्रायलच्या शेतकऱ्यांचं उदाहरण असंच आहे. ते संत्री पिकवतात, द्राक्षं पिकवतात, फळफळावळ पिकवतात, सगळं काही पिकवतात पण गहू पिकवीत नाहीत. त्यांचं म्हणणं असं की आम्ही द्राक्षं पिकवू, संत्री पिकवू आणि निर्यात करून आलेल्या पैशातून गहू विकत घेऊन खाऊ. ते आम्हाला जास्त परवडतं. खरं सांगायचं तर हिंदुस्थानातल्या जमिनीचे जे तुकडे झालेत ते पाहाता अगदी पंजाबमध्येसुद्धा धान्य पिकवणे व्यवहार्य नाही. तेव्हा हिंदुस्थानला कुणी आमच्यापेक्षा कमी भावाने धान्य विकायला तयार असला तर आम्ही त्याचा विरोध करणार नाही.

आम्ही १९८० सालापासून हे मांडत आलो आहोत. मी त्यावेळी अमेरिकेतून आयात होणाऱ्या गव्हाला विरोध करीत होतो, पाकिस्तानातून येणाऱ्या कपाशीला विरोध करीत होतो. का करीत होतो? "सीआयए म्हणजे अमेरिका, आपला शत्रू असे मानता ना? मग आमच्या पंजाबमधल्या देशभक्त शेतकऱ्यांनी, ज्यांनी पाकिस्तानापासून लढाईत देश तीनतीनदा वाचवला त्यांनी पिकविलेल्या गव्हाला जितका भाव देता त्याच्या दुपटीहूनही जास्त भाव या शत्रूच्या गव्हाला का देता? पाकिस्तान आमचा शत्रू ना? मग विदर्भाच्या शेतकऱ्याच्या कपाशीला जितका भाव देता त्याच्या दुप्पट भाव तुम्ही शत्रूच्या कपाशीला का देता? जर का तो आपल्यापेक्षा स्वस्त भावाने द्यायला तयार असेल तर मी त्याला खुल्या बाजारपेठेच्या तत्त्वज्ञानातून विरोध करणार नाही. तुम्ही या देशातल्या शेतकऱ्यांच्या कातडीच्या रंगाचे म्हणून त्यांनी पिकविलेला महाग माल खावा असे मी कधी म्हणणार नाही." खुल्या बाजारपेठेचा हा एक अर्थ स्पष्ट असावा म्हणून हा मुद्दा मी येथे मांडला.

**शेतकऱ्यांचे मित्र कोण? शत्रू कोण?**

खुल्या बाजारपेठेच्या व्यवस्थेत शेतकऱ्यांचे मित्र कोण? व्यापारी हे शतकऱ्यांचे मित्र की शत्रू? याही विषयावर शेतकरी संघटनेने ८० सालापासून निश्चित भूमिका घेतलेली आहे. त्यावेळी सगळे डावे लोक म्हणत असत की, 'शेतकऱ्याला भाव मिळत नाही याचं कारण व्यापारी. शेतकऱ्याला भाव मिळत नाही, ग्राहकाला फार किंमत मोजावी लागते याचं कारण, व्यापारी दोघांनाही लुटतो.' डाव्यांची ही भूमिका असली तरी ८० सालापासून आम्ही हे स्पष्ट केलेलं आहे की, व्यापारी हा शेतीमालाला भाव न मिळण्याचं कारण नाही. शेतकरी संघटनेच्या विचारसरणीत व्यापारी हा कुठं शत्रू नव्हताच. आजपर्यंतची शेतकरी आंदोलनाची सर्व प्रकाशनं तपासून पाहिली तर हे लक्षात येईल. एवढंच नव्हे तर, शेतीमालाला भाव मिळाल्यावर शेतकऱ्यांच्या हातात क्रयशक्ती येते आणि विकासाच्या चक्राला गती मिळते, व्यापाऱ्यांचा फायदा होतो हे जाणून गावोगावचे व्यापारी शेतकरी आंदोलनाच्या बाजूने उभे रहातात हे आम्ही अनुभवलं आहे.

पूर्वी मला अनेकदा लोकांनी म्हटलं आहे की, 'तुम्ही शेतकऱ्यांची बाजू मांडता पण त्याचबरोबर इतरांचेही प्रश्न मांडावेत. छोट्या उद्योजकांची फार वाईट स्थिती आहे, कारखानदारांचीही मोठी अडचण आहे, एक कारखाना काढायचा झाला तर दिल्लीला किती जणांसमोर जाऊन नाकं घासायला लागतात.' अगदी अलिकडे अलिकडे, शंतनुराव किर्लोस्करांसारखा मनुष्य म्हणाला की, ''खुली बाजारपेठ, खुली बाजार पेठ असा शासनाने डांगोरा पिटायला सुरुवात केली आहे; पण त्यांची खुली बाजारपेठ म्हणजे काय आहे? पूर्वी आम्हाला कारखाना काढतांना पंचवीस ठिकाणी जाऊन अर्ज करायला लागत होते, त्याच्या ऐवजी आता बावीस ठिकाणी अर्ज करायला लागतात. एवढाच फरक झाला.'' ८० साली सगळ्या लोकांना मी म्हणत होतो की, ''मला मान्य आहे की तुमचाही लढा व्हायला पाहिजे. माणसाला स्वतंत्र व्हायचं असेल तर त्याचा लढा फार व्यापक आहे. पण माझी धारणा अशी आहे की स्वातंत्र्याचा हा लढा लढवायचं काम आज शेतकरी करणार आहे. तुम्ही करणार नाही. कारण 'इंडिया'तला तुम्हाला जो काही थोडाफार मलिदा मिळतो त्याच्या मोहाने 'इंडिया' कडे झुकलेले राहाणार आहात. खुल्या बाजारपेठेकरिता लढा लढविण्याची कळकळ, हितसंबंध हा शेतकऱ्याकडे असतो. म्हणून मी शेतकऱ्याला या स्वातंत्र्यलढ्याचा सैनिक मानतो.' त्यामुळे कारखानदार काय किंवा छोटे उद्योजक काय, त्यावेळी या लढ्याचे सैनिक होऊ शकत नव्हते. दुसरी एक महत्त्वाची गोष्ट

समाजाला किमान शासन असावं. जितकं शासन जास्त तितका भ्रष्टाचार जास्त. Power corrupts, absolute power corrupts absolutely. हे तत्त्वज्ञान शहरातल्या लोकांनी मांडलं पण त्याची खरी ओळख ही शेतकऱ्यांनाच होते. कशी? शेतकरी या तत्त्वज्ञानाच्या धगीत होरपळत आले आहेत. आर्थिक दूरवस्थेत ठेवल्या गेलेल्या शेतकऱ्याला सातबाराच्या उताऱ्यापासून ते बँकेचे कर्ज मिळविण्यापर्यंत, उसाच्या तोडीपासून ते बिलाची रक्कम हातात

मिळेपर्यंत अशा अनेक प्रसंगी या शासनाच्या भ्रष्टाचाराने पूर्ण नागवून टाकले. सरकारी पकड कमी व्हावी आणि स्वतंत्रपणे जगायला मिळावं याच्यामध्ये व्यापारी हाच शेतकऱ्याचा खरा पाठीराखा आहे. ८४ साली विश्वनाथ प्रताप सिंगांनी राजीव गांधींच्या नेतृत्वाखाली एका तऱ्हेने खुल्या बाजारपेठेच्या व्यवस्थेला सुरुवात केली. त्यावेळी आम्ही त्यांना सांगितले की, 'ही खुली व्यवस्था कारखानदारांपुढे कशाला टाकताय? गाढवापुढे गूळ टाकून फायदा काय? ज्या कारखानदारांपुढे तुम्ही हा गूळ ठेवता आहात त्यांना त्याची चव नाही; त्यांना लायसन्स-परमीट व्यवस्थेतून मिळणाऱ्या फायद्याची फक्त चव आहे. खुल्या बाजरपेठेप्रमाणे जर का उत्पादकाला प्रोत्साहन दिलं, उत्तेजन दिलं तर तो काय चमत्कार करून दाखवतो हे पहायचं असेल तर ते शेतकऱ्याला देऊन पाहा आणि तीन वर्षांत देशात चमत्कार होतो किंवा नाही ते पहा.'

हे आम्ही पहिल्यापासून मांडलं. त्या बरोबर हेही म्हटलं होतं की, ''आज व्यापारी आमच्या बाजूने उभे राहातील असं दिसत नाही म्हणून मी शेतकऱ्याच्या पोटी न जन्मलेला, स्वित्झर्लंडहून आलेला शेतकऱ्यांच्या बाजूने उभा राहिलो याचं कारण ही जी क्रांती व्हायची आहे या क्रांतीचा प्रणेता शेतकरीच असू शकतो याची मला खात्री आहे.''

**व्यापक लढ्याची आवश्यकता**

आणि १९९० साली शेतकऱ्यांनी जो लढा एकट्याने लढवायचा तो कालखंड संपला आहे. आता तो एकटा लढवायला जाईल तर ते जमणार नाही, अशी जाणीव झाल्यानंतर त्या लढ्याचं जास्त व्यापक स्वरूप होणं भाग आहे. हे स्वरूप आम्ही कधी लपविलेलं नव्हतं, पहिल्यापासून ते मांडत आलो होतो. फक्त सुरुवातीला इतकंच म्हटलं की, ''कार्यक्रम हा शेतकऱ्याला मनुष्य म्हणून जगण्याचा आहे पण, त्याचा आता कार्यक्रम काय, तर शेतीमालाला भाव. तुम्ही आमच्या शेतीमालाच्या भावामध्ये हात घालू नका, मग आम्ही तुमच्याकडे काहीच मागायला येणार नाही; दुष्काळात उपाशी मेलो तरी मागायला येणार नाही.'' ही शेतकरी संघटनेची भूमिका होती. हे खुल्या अर्थव्यवस्थेचे तत्त्वज्ञान आहे.

**परिस्थितीनुसार डावपेच**

फक्त याच्यात एक डावपेच आम्ही लढवला. ८० साली जेव्हा आम्ही प्रचार करीत फिरायचो तेव्हा वेगवेगळे मार्क्सवादी, कुणी सीताबर्डीचा माऊ त्से तुंग तर कोणी मोदी बागेतला लेनीन असे सगळे म्हणत की, 'शेतकरी संघटनेचे नेते हे सगळे मोठ्या जमीनदारांचे पुढारी आहेत. ते कसलं शेतकऱ्याचं काम करणार?' तेव्हा आम्ही युक्तिवाद त्यावेळी असा केला की, ''तुम्हाला नियोजनाची व्यवस्था पाहिजे का खुल्या बाजारपेठेची व्यवस्था पाहिजे ते तुमचं तुम्ही निवडा, पण, नियोजनाची व्यवस्था करायची असेल तर पुरं नियोजन करा. मग, दुष्काळाच्या काळात आम्ही तुम्हाला लेव्ही घालू आणि मुबलकतेच्या काळात तुम्ही आम्हाला भाव बांधून द्या. नाही तर, खुली व्यवस्था द्या. दुष्काळात आम्हाला मरू द्या आणि जेव्हा जास्त पिकेल तेव्हा आमची आम्हाला काय मजा करायची असेल ती करू द्या. कोणती तरी एक व्यवस्था करा.''

एवढाफक्त दुट्टपीपणा आम्ही ८० साली केला. एरवी, आमच्या साहित्यातून सरकारी व्यवस्थेचा निषेध हा पहिल्यापासून सातत्याने सापडेल. आणि जो जो उद्योजक आहे त्या त्या उद्योजकाचा आणि आम्हा शेतकऱ्यांचा काही तरी आतड्याचा संबंध आहे हेसुद्धा आम्ही स्पष्ट केलं आहे. त्यामुळे, व्यापारी म्हणून कुणाला दूर ठेवण्याची आम्हाला आवश्यकता नाही. एवढंच नव्हे तर, उद्योजक म्हणून कुणाला दूर ठेवण्याचं कारण नाही.

**नेहरूनीतीविरोधाची परंपरा**

शेतकरी संघटनेची ही जशी खुल्या बाजारपेठेच्या पुरस्काराची परंपरा आहे तशीच नेहरूवादाला विरोधाचीही एक परंपरा आहे.

एक गोष्ट खरी आहे. एके काळी पंडित नेहरू, त्यांचं ते दिसणं, त्याचं ते रूप आणि त्यांचा तो गुलाब असं पाहिल्यानंतर त्यांच्यावर लट्टू झालेली जी तरूण पिढी होती त्या तरूण पिढीचा मीही एक सदस्य होतो. आज मला हे कबूल करतांना शरम वाटते. कारण, ज्यावेळी नेहरूव्यवस्थेवर टीका झाली आणि असं पहिल्यांदा म्हटलं गेलं की हे नियोजन नाही, ही लायसन्स-परमीट व्यवस्था आहे, तुम्ही नोकरशाही तयार करता आहात तेव्हा असं म्हणणारांना आम्ही मूर्खात काढत होतो. बोलणारी माणसं काही साधीसुधी नव्हती. त्यांच्यात, त्यागच मोजायचा झाला तर नेहरूंपेक्षा कित्येक पटीने त्याग केलेला चक्रवर्ती राजगोपालाचारीसांरखा मनुष्य होता. मला आज वाईट वाटतं आहे की, त्यावेळी आम्ही असं समजलो की चक्रवर्ती राजगोपालाचारी म्हणजे भांडवलदारांचे हस्तक आहेत; ए. डी. गोरवाला हे तर भांडवलदारांचेच, का तर, आय्. सी. एस्. मधून रिटायर झालेले, कन्हैयालाल मुन्शी हे तर उजव्या बाजूचे; प्रा. रंगा हे काही शेतकऱ्यांचे नेते नाहीतच; मिनू मसानी - समजावादावर पुस्तक लिहून प्रसिद्ध झालेले - पण, ज्या अर्थी टाटांच्या नोकरीत होते त्याअर्थी ते लोकांचं कल्याण करणारे असूच शकत नाहीत. म्हणून आम्ही, ही मंडळी नेहरूंचं चुकतं आहे असं ठासून मांडत असतांनासुद्धा नेहरू आणि त्यांच्या समाजवादाचा जयजयकार केला.

पण, ही गतकालातील चूक, कुठंतरी सुधारायला सुरुवात केली पाहिजे की नाही? चूक होऊन गेली, ती कबूलही करतो आम्ही. पण, नेहरूवादाला विरोध करणारा पहिला झेंडा, लायसन्स-परमिट राज्याला विरोध करण्याचा पहिला झेंडा हा चक्रवर्ती राजगोपालाचारींच्या नेतृत्वाखाली 'स्वतंत्र पक्ष' या नावाने उभारला गेला. त्याला यश मिळालं नाही. कारण, सगळ्यांनी या प्रयत्नाला मूर्खपणाचे नाव दिले. 'स्वतंत्र पक्षा'चे कागदपत्र तपासून पाहिले तर असे दिसून येते की जेव्हां पंडित नेहरू जमिनीच्या वाटपाचे कार्यक्रम मांडत होते, सीलिंग ॲक्टच्या गोष्टी करीत होते, सामूहिक शेतीचा प्रयोग मांडत होते त्यावेळी 'स्वतंत्र पक्षा'चे लोक कळवळून सांगत होते की, ''हा प्रश्न जमीनवाटपाचा नाही. जमीनवाटप करून हा प्रश्न सुटणार नाही. सामूहिक शेतीकरून कुणाचं कल्याण झालं नाही. भारतातला शेतकरी कष्टाळू आहे. त्याला चांगलं जगण्याची थोडी आशा दाखवा मग तो शेती चांगली करून दाखवेल.' पण, असं म्हणणाऱ्या लोकांना आम्ही लोकाविरोधी समजलो आणि केवळ छातीवर गुलाब लावतात म्हणून आणि गोरेपान

दिसतात म्हणून काही राजबिंड्याचं कौतुक केलं.

चूक उमगल्यावर ती आम्ही लपवून ठेवली नाही. उलट, उघड उघड नेहरूवादाचा विरोध केला. आम्ही काही नेहरूवादाचा विरोध आज सुरू केला नाही. माझ्या ८०/८५ सालांतील लेखांमध्ये नेहरू, इंदिरा गांधी, राजीव गांधी यांच्यावर टीका करतांना राजबिंडे हा शब्द वापरलेला आढळेल. फक्त, मी टीका करतांना संयम वापरला. त्यांच्यावर टीका करतांना कधी, इतर मंडळी त्यांच्या वैयक्तिक चारित्र्याविषयी चर्चा करतात तशी चर्चा केली नाही. आपलं हे आंदोलन चालू झाल्यानंतर काहींनी मला त्यांच्या वैयक्तिक चारित्र्याविषयी माहिती पुरविण्याचा प्रयत्न केला. पण, आम्ही जो काही विरोध करतो आहोत ते नेहरूंच्या सार्वजनिक धोरणांना करतो आहोत. त्यामुळे, ते वैयक्तिक बाबतीत कसे होते याची चर्चा करण्याचा प्रश्नच येत नाही. हा लढा धोरणाचा आहे. नेहरूंचे पुतळे जे उभे आहेत ते नेहरू काही एखाद्या सिनेनटापेक्षा चांगले दिसतात म्हणून उभे नाहीत, नेहरूंचे पुतळे उभे आहेत ते त्यांच्या धोरणाचं प्रतिक म्हणून उभे आहेत.

**नेहरूनीतीला विरोध करणार कोण?**

मग, या विरोधाला टोक आणयचं असेल तर काय करायला पाहिजे? एका बाजूला देशाचं दिवाळं वाजलं आहे. देशाला बाहेरची कर्ज फेडता येत नाहीत, देशातली कर्ज फेडता येत नाहीत. सर्वजण मान्य करतात की नेहरूवादी नियोजनामुळे हे झालं. अगदी, पी. व्ही. नरसिंह राव, मनमोहनसिंग म्हणतात की गेल्या चाळीस वर्षांतली दिशा आपल्याला बदलायला पाहिजे. टग्यांचे निगरगट्ट पुढारीसुद्धा म्हणू लागले आहेत की चाळीस वर्षं आमची चूक झाली. पण, कुणी असं म्हणायला तयार नाही की ही चूक झाली ती नेहरूंच्या धोरणाची. याचं कारण काय? नेहरू घराण्याचा दबदबा इतका आहे की दिल्लीतल्या '१०, जनपथ' मध्ये नेहरू घराण्याच्या वारसांनी जरा खूण केली तरी चारपाच काँग्रेसवाले असे गदारोळ करतील की पी. व्ही. नरसिंहरावना तिथं खुर्चीवर बसणं अशक्य होईल.

मग, नेहरूनियोजनाला तात्त्विक विरोध करणाऱ्या माणसांची तो विरोध जाहीरपणे मांडण्याची जबाबदारी रहाते. नेहरूंनी गांधीविचाराला - ग्रामअधिष्ठित अर्थव्यवस्थेला लेखी विरोध केलेला आहे. त्यांनी तो अंमलात आणून दाखवला आहे. आणि तो अंमलात आणून दाखवितांना जो नांगर चालवला तो शेतकऱ्यांच्या घरावर चालला. त्या धोरणाचे शेतकरी बळी ठरले. चीड कशाची यायची आणि कशाची येऊ द्यायची नाही? आपल्या देशातल्या समाजवाद्यांची नेहरूविषयीच्या कौतुकामागची भावना वेगळी आहे. शेतकऱ्यांचे दुःख ज्याच्या आतड्यापर्यंत पोहाचलं आहे त्याला नेहरूंच्या गुलाबाचं कौतुक वाटता कामा नये. ज्यांना नेहरू धोरणाला विरोध करणे अजूनही रास्त वाटत नाही त्यांच्या आतड्यापर्यंत हे दुःख पोहोचलं आहे किंवा नाही ही शंका आहे. दहा वर्षे आम्ही लढाई केली आणि नेहरूंच्या आर्थिक नियोजनाच्या पद्धतीमुळे देशाचं वाटोळं झालं हे सिद्ध केलं. आणि तरीसुद्धा नेहरूघराणेशाहीमुळे भीती वाटून, चूक झाली ती नेहरूधोरणाची झाली हे म्हणण्याइतकी बौद्धिक प्रामाणिकता जर सुशिक्षितांकडे नसेल तर सुशिक्षितांना बौद्धिक प्रामाणिकपणा शिकविण्याचं काम अशिक्षित, अडाणी शेतकऱ्यांना करायला पाहिजे.

नेहरूवादाचा किंवा नेहरूंचा विराधे हा काही शेतकरी संघटनेने पहिल्यांदा मांडलेला मुद्दा नाही. आजपर्यंत जे काही आम्ही लिहिलं आहे ते वाचलं किंवा आजपर्यंत बोललेलं ऐकल्याचं आठवलं तरी हे लक्षात येईल.

आणि आता जर का नेहरूवादाच्या विरोधाला टोक आणण्याचं काम केलं नाही तर काय दहा वर्षांनी करायचं?

दहा वर्षांनी या गतीने सर्व संपलेलं असेल. या विरोधाला जर टोक आणायचं असेल, नेहरूवादी पद्धती का खुली बाजारपेठ याचा निकाल लावायचा असेल, तर ती वेळ आज आहे. रशियन तथाकथित समाजवादी साम्राज्य कोलमडलं आहे. आणि त्या आधाराआधाराने राहाणारे तिसऱ्या जगातील टिनपाट नियोजक, हौशी नियोजक - रशियातल्या लोकांनी व्यावसायिकरित्या शास्त्रशुद्ध पद्धतीने नियोजन करण्याचा प्रयत्न तरी केला – हे तर हौशेगवशेनवशे नियोजक. रशियातला नियोजनाचा जनक गेल्यावर जर तुम्ही या नियोजनाची पाळंमुळं हिंदुस्थानातून उखडून काढली नाही तर तुम्हाला पुन्हा कधी तसा मोका मिळणार नाही.

ही मांडणी लेखांमधून केल्यानंतर शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी ३ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर १९९२ या काळात या मांडणीच्या कच्च्या अभ्यासावर नेहरूनीती पुतळ्याच्या दहनाचा कार्यक्रम, काहीसा हात राखून कार्यक्रम केला याच्याबद्दल माझ्या मनात काही राग नाही. उलट, ही प्राथमिक परीक्षा झाली. जसं, एखादं इंजेक्शन एखाद्या रोग्याला दिल्यावर त्याला ते सोसेल की नाही हे पडताळण्यासाठी डॉक्टर त्या इंजेक्शनचा आधी बारीकसा डोस देऊन पाहातात तसं हे पहिलं बारीकसं इंजेक्शन झालं. आता दुसरं इंजेक्शन द्यायचं किंवा नाही हे बघा. पण, नेहरूवाद संपला आहे, आता नेहरूवादाचं भूत गाडून टाकायला पाहिजे अशा आशयाचा तो लेख लिहिल्यानंतर माझ्या मनात आशा वाटली होती की शेतकरी संघटनेच्या गेल्या दहा वर्षातील नेहरूवादाविरोधाच्या परंपरेचा परिणाम म्हणून शेतकऱ्याचं एखादं तरी पोरगं उठेल आणि 'पागल' पणा करून दाखवेल. माझी आशा फोल ठरली.

आता प्रश्न उरतो तो म्हणजे नेहरूवादाच्या विरोधात राजकीय आघाडी उभी करायची का आणखी काय करायचे? आघाडी उभी करायची तरी कशी करणार? एक धडा आपल्याला, सुरुवातीला 'स्वतंत्र पक्षा' ने जो प्रयत्न केला त्यापासून मिळतो. खुल्याबाजारपेठेच्या बाजूने कोण आहे, विरुद्ध कोण आहे?

**प्रशासन : झारीतील शुक्राचार्य**

हिंदुस्थानामध्ये नेहरूवादाने खरं कौतुक आणि कल्याण कोणाचं केलं असेल तर ते नोकरदाराचं. आज पी. व्ही. नरसिंहराव सरकार समोर सगळ्यात महत्त्वाचा प्रश्न कोणता आहे? तुम्ही खुल्या बाजारपेठेविषयी बोला खूप, निर्यातीविषयी बोला खूप, पण हिंदुस्थानला निर्यात करणं शक्य नाही. याचं कारण कारखानदारांची अकार्यक्षमता तर आहेच, पण सगळ्यात अडथळा कोणता असेल तर तो देशाच्या

प्रशासनाचा आहे. कोणत्याही कारखानदाराला विचारलं तर तो म्हणेल की निर्यातीआड सगळ्यात मोठी डोकेदुखी प्रशासन हलविण्यात आहे. प्रशासनाचं जोपर्यंत विसर्जन होत नाही तोपर्यंत या देशातले उद्योजक हे कार्यक्षम होऊ शकत नाहीत. मी एक वाक्य नेहमी वापरलं आहे की देशामध्ये नवा एखादा पंतप्रधान आला आणि तो देशाचं कल्याण करेल किंवा नाही असा प्रश्न पडला तर त्यासाठी एक फूटपट्टी तयार आहे. जो पंतप्रधान पंतप्रधान झाल्यानंतर सरकारी नोकरशाहीची चौकट मोडू शकत नाही, एकदा नोकरीला लागलं की कसंही काम करा, पंचावन्नाव्या वर्षी निवृत्त होईपर्यंत नोकरीला धक्का नाही ही व्यवस्था मोडू शकत नाही, तो या देशाचं कल्याण करू शकत नाही. नोकरदारांना घ्यायचं असेल तर पाच वर्षाच्या बोलीने लावून घ्या. पाच वर्षांनंतर त्याला पुन्हा नोकरीवर ठेवायचं किंवा नाही हे त्याने पाच वर्षात केलेल्या कामावर ठरेल आणि त्याप्रमाणे त्याचा पुढचा पगार ठरेल. कोणत्यातरी कमिशनने सांगितलं म्हणून तीन हजार पाचशे ते नऊ हजार आठशे आणि इन्क्रिमेंट इतकी ठरलेली, आणि त्यावर महागाई भत्ता आणि निवृत्तीनंतर पेन्शन इतकी, अशी व्यवस्था आहे तोपर्यंत देशाचं भलं होऊ शकत नाही. हे नोकरदार शेतकऱ्यांच्या बाजूने येणे शक्य नाही. आणि त्यांचीच आज सरकारला सगळ्यात मोठी धास्ती आहे.

म्हणजे, पी. व्ही. नरसिंह राव सरकारला जर त्यांच्या मनामध्ये खुल्या बाजारपेठेकडे जायचे असेल तर अडथळे कोणते? एक, दहा जनपथमधील नेहरूघराणेशाही. दुसरी अडचण, नोकरदार. जर का खुल्या बाजारपेठेची व्यवस्था राबवायला सुरुवात केली तर मंत्रालयातली एक फाईल इकडची तिकडे हलणार नाही. पुन्हा, या मंत्र्यांनी जी काही प्रकरणे पूर्वी केली असतील त्यांचे पुरावे या नोकरदारांच्या हाती आहेत, त्यामुळे त्यांना नाराज करण्याचं धारिष्ट्य या सरकारकडे नाही. त्यामुळे, एका बाजूने नोकरदारांचा दबाव, दुसऱ्या बाजूला राजकीय दबाव आणि त्याबरोबरच उलट्या बाजूला आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि जागतिक बँकेचा दबाव आणि त्यात भर टाकण्याकरिता आणखी एखादा दबाव तयार झाला तर तिथे कुणी पंतप्रधानाच्या जागेवर जाऊन येत्या दहा वर्षात काही बदल होईल हे शक्य वाटत नाही. तरीही जे कोणी त्या जागेवर येतील त्यांना इकडं तिकडं वाकवता कसं येईल हे पाहिलं पाहिजे.

**संधी हुकता नये**

हे करण्यासाठी 'स्वतंत्र पक्षा'च्या पद्धतीची एक आघाडी उघडली जाऊ शकते. स्वतंत्र पक्ष अपयशी झाला याचं एक फार महत्त्वाचं कारण आहे. त्यांची मांडणी बरोबर होती, त्यांचं लिखाण बरोबर होतं, त्यांचा कार्यक्रम बरोबर होता, त्यांचं तत्त्वज्ञान बरोबर होतं पण त्यांच्यासमोर अडथळा होता तो नेहरूघराण्याच्या भक्तीचा आणि त्यातून निर्माण झालेल्या लायसेन्सपरमीट नेहरूधोरणाचा. त्यामुळे तो प्रयोग फसला. या जुन्या प्रयोगाचा पुरस्कार करायचा असला तर करा किंवा नका करू, पण उद्योजकांना आपली मागणी पुढे मांडण्याची संधी मिळालेली आहे. आणि ही जर संधी साधली गेली तर मग शेतकऱ्याची बदलेली जी भूमिका आहे तिचा सन्मान झाला असं होईल. आम्ही इतके दिवस डाव्यांच्या बरोबर जात होतो. कारण ते लढायला तयार होते. व्यापारी लढायला तयार नव्हते. आणि लोकांना आम्ही त्यावेळी काय म्हणत होतो? शेतकरी आणि मजूर यांत काय फरक आहे? शेतकऱ्यांकडे फक्त जमीन आहे एवढंच की नाही? पण, आम्हाला वेतनसुद्धा पुरंसं मिळत नाही.

**शेतकरी : स्वनियुक्त उद्योजक**

शेगावपासून आम्ही ही भूमिका सोडून देतो आहोत. शेगावपासून शेतकरी हा उद्योजक आहे, स्वनियुक्त (Self-employed). त्याची निश्चित पगाराची मागणी नाही. तर, स्पर्धा करून, बाजारात उतरून स्वतंत्रपणे क्षणाक्षणाने, कणाकणाने जगण्याची इच्छा असलेला असा हा उद्योजक शेतकरी आहे. असे जे जे उद्योजक असतील ते ते आमचे मित्र आहेत. आणि सकाळी १० वाजल्यापासून ५ वाजेपर्यंत टेबलापाशी बसून चौदा कप चहा पिऊन एक तारखेला पगार मिळाला पाहिजे, त्यानंतर महागाईभत्ता मिळाला पाहिजे, दर सुट्टीमध्ये घरी किंवा ट्रीपला जायला प्रवासभत्ता मिळाला पाहिजे आणि निवृत्त झाल्यानंतर पेन्शन मिळायला पाहिजे असं म्हणणारा मनुष्य आमचाच नव्हे तर देशाचा शत्रू आहे. ही भूमिका मांडण्याचं नेतृत्व तुम्ही शेतकरी कार्यकर्ते घेत असाल तर शेतकरी आंदोलनाची भूमिका तुम्ही खऱ्या अर्थाने बजावता आहात असं म्हणता येईल.

नाही तर काय होईल? डॉन क्विझोट सारखं किंवा ऐतिहासिक बहुरुप्यांसारखं होईल. जुनी इतिहासातली पुस्तकं वाचायची किंवा शिवाजीवरची पुस्तकं वाचायची आणि शौर्य गाजवायला निघायचं म्हणजे शिवाजीसारखं चिलखत आणि जिरेटोप घालून घोड्यावरून निघायचं आणि समजायचं की आता आपण इतिहास घडवतो. शिवाजी दोन वेळा त्याच वेशात कधी पृथ्वीवर येत नाही. प्रत्येक वेळी येतो, त्यावेळी त्याचा वेश नवा असतो. या नव्या वेशामध्ये यायची जर का तुमची तयारी असली तर शेतकरी संघटनेची भूमिका तुम्ही पार पाडू शकाल.

**आंदोलन कशासाठी**

खुल्या बाजारपेठेच्या पुरस्काराची मांडणी करीत असतानाच शेतकरी संघटना आंदोलनात्मक कार्यक्रमाचे दोन निर्णय घेत आहे. पण, हे निर्णय या भूमिकेशी विसंगत नाहीत हे स्पष्ट करणे आवश्यक आहे.

ज्या लोकांनी शेतकरी आंदोलनाला नेहमी विरोध केला, ज्या लोकांनी शेतकरी आंदोलनाचा द्वेष केला, ज्या लोकांनी एस्. आर. पी. ला वायरलेसवरून आंदोलक शेतकऱ्यांच्या हालचालींची माहिती पुरवली ती मंडळी आता झेंडे घेऊन खत भाववाढ रद्द झालीच पाहिजे, विजेची दरवाढ बंद झालीच पाहिजे अशा घोषणा देतात. एवढंच नव्हे तर, शेतकऱ्यांचे नेते शरद जोशी कुठे गेले आहेत अशी भाषणं देत आहेत. ही मंडळी कोण आहेत? ही मंडळी प्रामुख्याने काँग्रेसमधली आहेत. कोण्या एका कृषि उत्पन्न बाजार समितीचे अध्यक्ष, फलाण्या खरेदी विक्री संघाचे अध्यक्ष ही सगळी मंडळी आता बाहेर पडली आहेत. कारण, मनमोहनसिंगाना जरी समजलं नाही की हा शेतकऱ्यांचा चाप त्यांना कुठं बसतो आहे तरी

या मंडळींना हा चाप कळायला लागला आहे. नेहरूव्यवस्थेमध्ये शेतीमालाला भाव नसतांनासुद्धा ज्या पुढाऱ्यांनी आपलं भलं करून घेतलं त्या पुढाऱ्यांना आता भलं करून घेता येणं शक्य राहिलं नाही. या दु:खानं ती मंडळी ओरडायला लागली आहेत. ही गावगन्ना कृषिउत्पन्न बाजार समिती आणि खरेदी विक्रीसंघाची माणसं ओरडायला लागली आहेत कारण, खुल्या बाजारपेठेचा चाप त्यांना बसायला लागला आहे. परवा पंतप्रधानांना शेतकऱ्यांचं एक शिष्टमंडळ भेटायला गेलं होतं. त्यातल्या लोकांची नावंसुद्धा याआधी कधी ऐकायला मिळाली नव्हती. पण, पंतप्रधानांनी त्यांना भेट दिली, मुलाखतीचं दृष्य टेलिव्हिजनवर तीनतीनदा दाखवलं. आणि वर प्रत्येकाला दोन हजार रुपयांची दक्षिणा देऊन त्यांना पंतप्रधानांनी पाठविलं. याचं कारण असं की शेतकऱ्यांच्या नावाने एक पर्यायी शक्ती उभी करण्याचा प्रयत्न होऊ लागला आहे. जसं, जॉर्ज फर्नांडिस आता शेतमजुरांच्या कळवळ्यानं बोलू लागले आहेत तसं शेतकऱ्यांचा कधीही कळवळा नसलेली मंडळी ही आता अशा तऱ्हेचे प्रश्न घेऊन उठून उभे राहायला लागलेली आहेत.

आपण आता बोलायला पाहिजे की, खताचा भाव वाढला हे खरं तर चांगलं झालं. मी त्याच्यापुढं जाऊन असंही म्हणतो की गेल्यावेळी तीसच टक्के वाढला, यावेळी आणखी तीस टक्के वाढायला पाहिजे होता. पण, आपण बोलत काही नाही. फक्त लेख लिहितो. पत्रकारांनासुद्धा आपली भूमिका कळत नाही. पण आम्ही या विषयावर बोलत नाही म्हणून आमंच अस्तित्वच नाही असा कुणाचा गैरसमज होऊ नये. म्हणून, आंदोलन करायची आवश्यकता आहे. म्हणून ते करायचं. देशात गव्हाचं उत्पादन मुबलक मलाही माहीत आहे. पण, यंदा गहू आणतील. पुढच्या वषी गहू आणायला पैसे कोठून आणतील? पुढच्या वर्षी सरकार कोंडीत सापडेलच ना? पण, शेतकरी संघटनेने गहू उतरविणाऱ्या बंदराच्या नाकेबंदीचा आणि मंत्र्यांना गावबंदीचा कार्यक्रम जो जाहीर केला आहे त्यात सूट सबसिडीचा शोध घेण्यास शेतकऱ्यांची नाही, तर मनुष्य म्हणून सन्मानाने खुल्या व्यवस्थेमध्ये जगू इच्छिणाऱ्या उद्योजक शेतकऱ्यांची संघटना काय मागते हे स्पष्ट होण्याकरिता आपल्याला ही आंदालनं घेणं आवश्यक आहे.

गावबंदीचा कार्यक्रम तर सोपाच आहे. शेतकरी मंत्र्याला झेंडे दाखवायला आनंदाने तयार होतील. आणि नाकेबंदीमागची भूमिका शेतकऱ्यांच्या पुढे मांडा, ते गव्हाचा वाणा बंदरात उतरू देणार नाहीत.

# अन्नधान्याची आयात थांबविणे अशक्य
## – पंतप्रधान

अन्नधान्याचा राखीव साठा पुरेसा ठेवण्यासाठी धान्याची आयात करणे आवश्यक आहे, ती थांबविता येणार नाही असे पंतप्रधान पी. व्ही. नरसिंह राव यांनी नवी दिल्ली येथे १६ ऑक्टोबर ९२ रोजी 'अखिल भारत रचनात्मक समजा'ने आयोजित केलेल्या एका कार्यक्रमात बोलतांना सांगितले.

अन्नधान्याच्या बाबतीत देश स्वयंपूर्ण नाही असा याचा अर्थ कुणी काढू नये असे सांगून श्री. राव पुढे म्हणाले की, "धान्याच्या पुरवठ्याबाबत दीर्घकालीन योजनेचा विचार करावा लागतो. प्रत्येक भारतीय नागरिकास त्याला परवडेल अश किंमतीत अन्नधान्य उपलब्ध करून देणे ही सरकारची जबाबदारीच आहे. त्यासाठी पुरेसा राखीव साठा ठेवणे आवश्यक आहे. एखादे वर्ष चांगले असते. पण, पावसाने दगा दिल्यास धान्याचे उत्पादन फार मोठ्या प्रमाणात घटते. अशा वेळी राखीव साठ्याचा उपयोग होतो. तो कायम राखण्यासाठी आयातीचा विचार करावा लागणार आहे.

ही बातमी सर्वच वर्तमानपत्रांमध्ये येऊन गेली. या बातमीत आयात केलेला गहू काय भावाने खरेदी केला आहे, भारतीय शेतकऱ्यांनी पिकविलेल्या धान्यातून राखीव साठा उभा करण्याची शक्यता आहे किंवा नाही, भारतीय शेतकऱ्यांना किती भाव दिला जातो इत्यादि मुद्द्यांवर पंतप्रधान काही बोलले का नाही याबाबत काही उल्लेख नाही.

१९९१-९२ मध्ये परकीय चलन मिळविण्यासाठी गव्हाच्या राखीव साठ्यातील आठ लाख टन गहू निर्यात केला तेव्हा भारतातील प्रत्येक नागरिकाच्या पोटाची काळजी घेण्याची जबाबदारी शासन विसरले होते का? आजही पंजाब, हरियाना, उत्तर प्रदेश, मध्यप्रदेश या राज्यांतील शेतकऱ्यांकडे त्यांना शासन किंमत मिळू देत नाही म्हणून गहू पडून आहे. या गव्हाची खरेदी महागड्या आयात गव्हापेक्षा कमी पण साडेतीनशे चारशेच्या भावाने करून हा राखीव साठा समृद्ध करता येणार नाही का? त्यामुळे वाचलेले परकीय चलन देशाला परकीय चलनाच्या संकटातून वर उचलायला उपयोगी होणार नाही का? चांगली किंमत मिळते म्हणून शेतकरी गव्हाचे उत्पादन वाढवणार नाहीत का? आणि या वाढीव उत्पादनातून देशातील नागरिकांना जेवू घालण्यासाठी राखीव साठा समृद्ध करून उरलेला गहू निर्यात करून परकीय चलन मिळविता येणार नाही का? हे प्रश्न इंडियाच्या पंतप्रधानांना कोणीच कसे विचारीत नाही?

आज गव्हाच्या आयातीच्या बातम्या येणे सुरू होताच देशातल्या गव्हाचे भाव धडाधड कोसळू लागले आहेत. इंडिया शासनाचा गहू आयातीचा निर्णय धान्याचा राखीव साठा कायम ठेवण्यासाठी आहे की भारतीय शेतकऱ्याला मिळत असलेले तुटपुंजे भावही पाडण्यासाठी आहे?

❖ ❖ ❖

# बळी

**सुभाष बोडेवार**
मु. पो. नंदगांव, ता. किनवट, जि. नांदेड

*बळी!
आम्ही तुझ्या राज्याची
आतुरतेनं वाट पहातोय.*

*आरे! ते आमच्या पुढं
रामराज्याचं मोठेपण सांगतात
पुन्हा इथं रामराज्य आणायचं म्हणतात
आणि आमच्या छातीत जाळ होतो
आमचा मेंदू तापलेला नांगराचा फाळ होतो.*

*बळी! आम्ही तुझ्या राज्याचे भुकेले
प्रत्येक दिवाळसणाला
तुझं राज्य यावं म्हणून
करुणा भाकतो.
विष्णूनं तुला कपटानं पाताळात गाडून
हजारो वर्ष झाली असावीत
पण
अम्ही तुला विसरलो नाही, बळी!
आम्ही तुझ्या राज्याचे भुकेले.*

*तू गेलास
आणि त्यांनी आम्हाला शस्त्रबंदी केली.
शास्त्रबंदी केली । मग
त्यांच्या राज्यात
आपल्या हक्कासाठी बंड करणाऱ्या
कित्येक शंबुकांची मुंडकी छाटली गेली.*

*बळी!
तू गेलास
आणि आम्ही पोरके पोरके झालो
आमच्याच मायभूमीत आम्ही
परके परके झालो । मग
त्यांच्या राज्यात आमच्या मेंदूवर
गुलामीचे प्रयोग सुरू झाले
ते आम्हाला सांगत होतो
तुम्ही काम करा
पण
कामाच्या मोबदल्याची
अपेक्षा बाळगू नका
तुम्हाला स्वर्ग मिळेल.*

*आणि आम्ही राबराब राबलो
घाम गाळून मातीतून मोती पिकवले.
त्यांनी ते बिनबोभाट लुटून नेले.
आम्हाला स्वर्ग मिळेल म्हणून
आम्ही गप्प होतो.*

*आम्ही बहुजन होतो, बळी!
आमची ताकद प्रचंड होती
आमच्या ताकदीची त्यांना भीती होती.
म्हणून त्यांनी षड्यंत्र रचलं
आमच्यात जातीजातीचं विष पेरलं.
मग आमचेच आम्ही शत्रू झालो
त्यांच्या विषाने आपापसात
खुन्नस धरून लढत राहिलो.*

*मग त्यांनी आमच्या गुलमीचं
जारकर्मी शास्त्र बनवलं
आणि त्या शास्त्रानुसार
आम्ही त्यांच्याकडून
वर्षानुवर्ष मरण जगलो.*

*बळी!
तू गेलास
कित्येक शतकापूर्वी । पण
आमच्या मेंदूचा एक अज्ञात कप्पा
आजही तुला विसरलेला नाही.*

*कित्येक शतकापासून तो
तुझ्या राज्याची आस बाळगून आहे.
ते पुन्हा इथं रामराज्य आणायचं म्हणतात.
आणि आमच्या छातीत जाळ होतो.
आमचा मेंदू तापलेला नांगराचा फार होतो.*

*बळी!
आता आम्ही जागे झालो आहोत.
अजून तुझी आठवण बाळगून असलेला
आमच्या मेंदूचा तो अज्ञात कप्पा
श्रमसूर्याच्या प्रखर तेजानं उजळून निघालाय*
* * * *
*आम्ही तुझे वंशज
आता फक्त
आम्ही तुझ्याच राज्याचा ध्यास धरलाय, बळी
आता आम्ही बळी जाणार नाही
इडा पीडा गाडून
तुझेच राज्य आणणार आहोत.*

# शेतकरी संघटक - काही सूचना

* **शेतकरी संघटकची वार्षिक वर्गणी गेल्या अंकापासून ३० रुपये करण्यात आली आहे.**
* शेतकरी संघटकचे वर्गणीदार गोळा करणाऱ्या कार्यकर्त्यांनी या बदलाची नोंद अवश्य घ्यावी.
* वर्गणीदारांची वर्गणी संपताना त्यांच्या शेवटच्या अंकावर 'वर्गणी संपली' असा शिक्का मारला जातो. असा शिक्का मारलेला अंक येताच प्रथम आपली वर्गणी मनीऑर्डरने पाठवावी म्हणजे पुढील अंक बंद होणार नाहीत. वर्गणी पाठविण्यासाठी कुणी कार्यकर्ता येण्याची वाट पाहू नका. कार्यकर्त्यांची वाट पाहाण्यात व त्यांच्याकडे वर्गणी दिल्यानंतर त्यांच्या कार्यबाहुल्यामुळे त्यांना ती या कार्यालयाकडे पाठविण्यास जो अवधी लागेल त्यामुळे तुम्हाला काही अंकांना मुकावे लागण्याची शक्यता आहे.
* शेतकरी संघटकची आजीव वर्गणी रु. ५००/- असून ती देणगी स्वरूपात घेतली जाते. शेतकरी संघटकच्या ज्या वाचकांना इतकी रक्कम भरणे अवघड वाटते ते एका वर्षापेक्षा अधिक वर्षांची वर्गणी पाठवून आपला अंक अखंडित ठेवू शकतील.
* कोणत्याही महिन्याच्या २ व १७ तारखांपर्यंत ज्यांची वर्गणी कार्यालयाकडे पोहाचते त्यांना अनुक्रमे लगेचच्या ६ व २१ तारखांपासून अंक पाठविणे सुरू होते.
* शेतकरी संघटक संबंधी सर्व पत्र व्यवहार करण्याचा पत्ता :
  शेतकरी संघटक
  अंगारमळा, मु. पो. आंबेठाण
  ता. खेड जि. पुणे

# कार्यकारिणी बैठक, औरंगाबाद

१०, ११ ऑक्टोबर १९९२

(वृत्तांत)

## आयात गहू उतरविणाऱ्या बंदरांची नाकेबंदी

## शेतकरी हुतात्मा दिन, १० नोव्हेंबर १९९२ पासून राज्य व केंद्र शासनाच्या मंत्र्यांना गावबंदी

## खुल्या अर्थव्यवस्थेच्या समर्थकांची आघाडी बांधणार

शेतकरी संघटनेच्या कार्यकारिणीची बैठक १०-११ ऑक्टोबर १९९२ रोजी औरंगाबाद येथे श्रीवरद गणेशमंदिराच्या सभागृहात पार पडली.

पावसाळ्यानंतरची ही पहिलीच बैठक. सर्वप्रथम बैठकीत महाराष्ट्रभरच्या पीक परिस्थितीची माहिती सर्व जिल्हाप्रमुखांनी दिली. उशिरा आलेल्या पावसामुळे कापूस, ऊस, तेलबिया, कडधान्ये इत्यादि नगदी पिकांची परिस्थिती संपूर्ण महाराष्ट्रात फारच वाईट असल्याचे निदर्शनास आले. ज्वारीचे व बाजरीचे पीक मात्र एकदोन जिल्हे वगळता इतर भागात. उत्तम आले असल्याचे सर्व जिल्हा प्रमुखांनी सांगितले. पण, ज्वारीची खरेदीव्यवस्था योग्य वेळी आणि योग्य प्रकारे उभी राहिली नाही तर मात्र शेतकऱ्यांना ज्वारी मातीमोलाने विकण्याची पाळी येईल अशी भीतीही त्यांनी व्यक्त केली. उसाच्या भावावर शासनाने कमाल मर्यादा घातल्याबद्दल ऊसउत्पादक भागातील कार्यकर्त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.

दीड वर्षापूर्वी सत्तेवर आल्या आल्या पी. व्ही. नरसिंहराव शासनाने खुल्या अर्थव्यवस्थेची घोषणा केली. पण या शासनाने अर्थव्यवस्था जी काही तुटपुंजी खुली केली ती गेल्या चाळीस वर्षांत अकार्यक्षम म्हणून सिद्ध झालेल्या औद्योगिक क्षेत्रासाठीच मर्यादित ठेवली. शेतीक्षेत्राला या खुलेपणाचा वाराही शासनाने लागू दिला नाही. उलट, शेतीच्या या लुटीवरच आधारलेली नेहरूवादी व्यवस्था शासनाने शेतीच्या बाबतीत अधिक घट्ट केली. इतपत की देशामध्ये मुबलक अन्नधान्य पिकले असतांनासुद्धा देशातील शेतकऱ्यांना रास्त भाव न देता परदेशातून दुपटीहून जास्त खर्च करून गव्हाच्या आयातीचे करार शासन करू लागले आणि विनाविलंब गव्हाची आयात करू लागले; तेही, देश परकीय चलनाच्या संकटात असतांना. नेहरूनीतीच्या वाढत्या अंमलबजावणीचा निषेध करण्यासाठी शेतकरी संघटनेच्या कृतीसमितीने ऑगस्टच्या २४/२५ तारखेला नांदेड येथे एक बैठक घेऊन एक जनजागरण मोहीम आखली. त्यानुसार ३ सप्टेंबर १९९२ ते २ ऑक्टोबर १९९२ या काळात वेगवेगळ्या जिल्ह्यांत ही मोहिम राबविण्यात येऊन नेहरूनीतीचा फास शेतकऱ्यांच्या गळ्याभोवती अधिकाधिक घट्ट कसा आवळला जात आहे याची माहिती कार्यकर्त्यांनी शेतकऱ्यांना दिली.

कार्यकारिणीच्या औरंगाबाद बैठकीत जिल्हा प्रमुखांनी आपापल्या जिल्ह्यातील मोहिमेची माहिती दिली.

नागपूर, लातूर, नांदेड,परभणी या जिल्ह्यांत ३ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या काळात तर उस्मानाबाद जिल्ह्याच्या भूम तालुक्यात १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या काळात कार्यकर्त्यांनी प्रचारयात्रा, पदयात्रा काढून गावोगाव सभा घेतल्या व जगात सगळीकडे शेतकऱ्यांना पोषक खुल्या अर्थव्यवस्थेचे वातावरण तयार होत असतांना इंडिया शासन मात्र नेहरूनीतीचीच अधिक प्रखर अंमलबजावणी करून शेतीक्षेत्राचे शोषण कसे करीत आहे याची शेतकऱ्यांना माहिती दिली. शेतकऱ्यांनी ही माहिती ऐकून गावोगाव नेहरूनीतीच्या प्रतिकात्मक प्रतिमेचे दहन केले. या सर्व प्रचारयात्रांचा समारोप २ ऑक्टोबर रोजी नागपूर जिल्ह्यांत काटोल येथे, नांदेड जिल्ह्यात कंधार येथे लातूर व परभणी या जिल्ह्यांच्या ठिकाणी हजारो शेतकरी स्त्रीपुरुषांच्या साक्षीने नेहरूनीती प्रतिमेचे दहन करून करण्यात आला.

अमरावती, अकोला, वर्धा, चंद्रपूर, यवतमाळ, जालना, नाशिक, जळगाव, नगर, औरंगाबाद, कोल्हापूर, धुळे या जिल्ह्यांत कार्यकर्त्यांनी ३ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या काळात गावोगाव बैठका घेऊन नेहरूनीतीचा निषेध केला व २ ऑक्टोबर रोजी काही जिल्ह्यांच्या ठिकाणी तर काही जिल्ह्यांत गावोगाव नेहरूनीतीच्या पुतळ्याचे दहन करण्यात आले.

या प्रचारयात्रांच्या काळात कार्यकर्त्यांनी माजघरशेती, व्यापारशेती या चतुरंग शेतीच्या दोन अंगांचे विश्लेषण करून त्यांचे महत्त्व पटवून दिले. तसेच, शेतकरी संघटक या पाक्षिकाचे आजीव व वार्षिक वर्गणीदार बनविण्याचे काम केले.

पीक परिस्थिती व नेहरूनीती दहन कार्यक्रमाचा अहवाल देतांना अकोला जिल्हाप्रमुखांनी म्हटले की, 'शेंडी तुटो की पारंबी तुटो' असे आंदोलन व्हायलाच पाहिजे; पुतळे जाळून किंवा पोपटपंची करून आता भागणार नाही.

कार्यकर्त्यांची पीक परिस्थिती व नेहरूनीती दहन कार्यक्रमाचा अहवाल सादर केल्यानंतर श्री. शरद जोशी यांनी बदलत्या आर्थिक परिस्थितीच्या अनुषंगाने बैठकीला मार्गदर्शन केले. मुक्त अर्थव्यवस्थेची चाहूल म्हणजे शेतकरी संघटनेच्या गेल्या दहा वर्षातील प्रयत्नांची उद्दिष्टपूर्ती आहे असे सांगून त्यांनी आता शेतकऱ्याला मिळालेले स्वातंत्र्य उपभोगण्यासाठी व टिकविण्यासाठी शेतकरी संघटनेची नवीन बांधणी करण्याची आवश्यकता प्रतिपादन केली. या नव्या बांधणीची संघटना ही सूट सबसिडीचा शोध घेणाऱ्या शेतकऱ्यांची न राहाता मुक्त अर्थव्यवस्थेत आत्मविश्वासाने, धाडसाने उतरणाऱ्या उद्योजक शेतकऱ्यांची असणे आवश्यक आहे. आजपर्यंतच्या संघर्षात्मक लढ्याच्या सैनिक केवळ शेतकरी होता. पण यापुढे सुरू होणाऱ्या आर्थिक लढ्यामध्ये उद्योजक शेतकऱ्यांच्या बरोबरीने लायसन्स-परमीट राज्याच्या तावडीतून सुटलेले व्यापारी व उद्योजकही सामील होऊ शकतील. मात्र, शेतकऱ्यांच्या लुटीवर आधारलेल्या व्यवस्थेवर पोसलेली नोकरशाही ही या स्वातंत्र्यलढ्यात शेतकऱ्यांच्या बाजूने कदापि उभी रहाणार नाही हेही त्यांनी ठामपणे सांगितले. नेहरूव्यवस्थेच्या अंतर्गत सूटसबसिडीच्या साहाय्याने खताचे भाव कमी राहावेत, विजेचे दर कमी राहावेत अशा मागण्या करणारे शेतकरी शेतकरी आंदोलनाचे सैनिक राहूच शकत नाहीत असे सांगून शेतकरी संघटनेचा 'शेतकऱ्यांना सन्मानाने जगण्याचा' कार्यक्रम यशस्वी करायचा असेल तर शेतकऱ्यांनी आता मुक्त अर्थव्यवस्थेत स्पर्धेत उतरून व्यावसायिक शेती करण्यास सुरुवात केली पाहिजे असे सांगितले.

या लढाईतले नवे साथीदार शोधून नव्याने संघटना बांधणीच्या कामाला कार्यकर्त्यांनी लागावे अशी सूचना त्यांनी केली. मुक्त अर्थव्यवस्थेमध्ये ऐतखाऊ प्रशासनाचे महत्त्व हे अडसर ठरणार असल्याने देशाच्या एकूणच व्यवस्थेचे निःशासनीकरण करण्यासाठी यापुढे संघटनेला लढा द्यावा लागणार असल्याचे ते म्हणाले.

शासन सध्या करीत असलेली गव्हाची चढ्या भावाने आयात ही मुक्त अर्थव्यवस्थेच्या तत्त्वज्ञानाच्या विरुद्ध आहे म्हणून श्री. शरद जोशींनी सरकारच्या या कृतीचा तीव्र निषेध केला. तसेच, महाराष्ट्र शासनाने उसाच्या भावावर घातलेली मर्यादा ज्वारी व कापूस यांना रास्त भाव देण्याबद्दल दाखविलेली अनास्था यावरही त्यांनी कठोर टीका केली.

नेहरूनीती टाकून देऊन देशात मुक्त अर्थव्यवस्थेचा पुरस्कार करण्यासाठी देशात राजगोपालाचारींच्या 'स्वतंत्र पक्षा' च्या धर्तीवर एक सर्वस्वी नवी राजकीय आघाडी उभी रहाणे आवश्यक असल्याचेही शरद जोशींनी आपल्या भाषणात सांगितले.

श्री. शरद जोशींच्या भाषणानंतर त्यांनी मांडलेल्या मुद्द्यांवर कार्यकर्त्यांनी चर्चा केली. चर्चेत किशोर माथनकर, प्रकाश पोहरे, पाशा पटेल, विजय जावंधिया, विठ्ठल भंडरवाड, सुमनताई अग्रवाल, ब. ल. तामस्कर, पाशा पटेल, अजित नरदे, मदन कामडे, माणिकराव पवार, गोविंद जोशी, डॉ. बोंडे, मोहन गुंजाळ, नितीन देशमुख, तात्या मगरे, बाळासाहेब शिंदे, शंकर वर्णे, ॲड. उमरीकर, रवी काशीकर, शिवानंद दरेकर, शंकर धोंडगे इत्यादी कार्यकारिणी सदस्यांनी भाग घेतला.

**आंदोलनाचा कार्यक्रम : 'ही शेंडी, ही पारंबी'**

(पान १२ पहा)

## शेतकरी संघटना कार्यकारिणी

दि. १०-११ ऑक्टोबर १९९२ रोजी औरंगाबाद येथे झालेल्या बैठकीत

**ठराव करते,**

राव शासनाच्या खुल्या अर्थव्यवस्थेच्या धोरणाकडे वटचालीचे शेतकरी संघटनेने स्वागत केले होते. वरखतांवरील सबसिडी कमी करून खतांचे भाव वाढविण्यात आले त्याचेही संघटनेने या दृष्टीने स्वागत केले होते.

गेल्या काही महिन्यातील अनुभवावरून स्पष्ट दिसते की राव शासनाची खुल्या अर्थव्यस्थेची नीती फक्त 'इंडिया' पुरती मर्यादित आहे; 'भारता'स ती लागू करण्याची त्यांची मनीषा नाही.

गव्हाची दहा लाख टनाची खरेदी कॅनडात करण्यात आली. नवीन दहा लाख टन गव्हाची आयात ठरत आहे. तेल, दूधभुकटी इत्यादींची आयात केली जात आहे. शेतीमाल निर्यातीवरील बंधनांत काही फरक नाही, यावरून शासनाची दुटप्पी नीती स्पष्ट होते.

शेतकरी संघटनेने खुल्या अर्थव्यवस्थेसाठी सातत्याने संघर्ष केला आहे. हा लढा नेटाने पुढे चालविण्यासाठी पुढील कार्यक्रम ही कार्यकारिणी जाहिर करीत आहे.

* गव्हाचा साठा देशात भरपूर आहे, ज्वारीचे भाव कोसळत आहेत. अशा परिस्थितीत चढ्या भावाने गव्हाची आयात चालू राहिल्यास देशात येणारा गहू ज्या बंदरात उतरेल त्या बंदाराची अनिश्चित काळ 'नाकेबंदी' करण्यात येईल. याखेरीज, देशभर गव्हाची पेरणी कमी करण्याचा कार्यक्रम राबविण्यात येईल.
* उसाच्या भावावर महाराष्ट्र शासनाने घातलेल्या मर्यादा, ज्वारी व कापूस यांना रास्त भाव देण्याबद्दल शासनाची अनास्था यांचा निषेध करण्यात येत आहे. या प्रश्नांवर काही ठोस निर्णय, शासनाने जाहिर करावे, अन्यथा, १० नोव्हेंबर १९९२ पासून महाराष्ट्र व केंद्र शासनाच्या सर्व मंत्र्यांना महाराष्ट्रभर गावबंदी जाहिर करण्यात येईल.
* खुल्या अर्थव्यवस्थेच्या दिशेने वाटचाल थंडावू नये यासाठी त्या व्यवस्थेच्या सर्व समर्थकांची एक आघाडी बनविण्यासाठी शेतकरी संघटना पुढाकार घेईल.

११-१०-९२

**किशोर माथनकर**
अध्यक्ष
शेतकरी संघटना

# हरियानात गव्हाच्या किंमती उतरू लागल्या

शासनाने गव्हाला प्रतिक्विंटल (२५० + २५) रुपये आधारभूत किंमत जाहिर केली असली तरी हरियानाच्या बाजारपेठेतील गव्हाची खुली किंमत प्रतिक्विंटल ३५० ते ४५० रुपये होती. या व्यतिरिक्त, दिल्लीतील जवळपासच्या मंडींत अधिक भाव मिळत असल्याने सोनपत जिल्ह्यातील शेतकरी तिकडेही गहू नेत होते.

पण आता हरियानाच्या बाजारपेठेतील गव्हाची खुली किंमत घसरून प्रतिक्विंटल ३२५ ते ४०० रुपयांपर्यंत झाली आहे.

अन्नधान्य पुरवठा खात्याने आपल्या गव्हाच्या राखीव साठ्यातील गहू मोठ्या प्रमाणात बाजारात सोडल्यामुळे भावातील ही घसरण चालू झाली असावी असे दिसते.

शेतकऱ्याच्या गव्हाला भाव मिळू न देणाऱ्या इंडिया शासनाचे कृषिमंत्री श्री. बलराम जाखर यांनी सांगितले की शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी शासन ६६३ कोटी रुपयांची एक योजना राबविणार असून दुसऱ्या एका योजनेखली ६०० कोटी रुपये ठिबक सिंचन, ४५० कोटी रुपये खतवितरण व ३४० कोटी रुपये शेतीसाठी आवश्यक इतर निविष्ठांच्या अनुदानासाठी खर्च करण्यात येणार आहेत.

त्याचप्रमाणे, येत्या वर्षात प्रत्येकी २० लाख टन साखर व कापूस निर्यात करून देशासाठी परकीय चलन मिळविण्यात येईल असेही कृषिमंत्र्यांनी सांगितले.

दरम्यान, राष्ट्रीय अन्न महामंडळ हरियानाच्या बाजारपेठेतील आजची बाजरीची किंमत ३५० रुपये प्रतिक्विंटल ही २५० रुपयांपर्यंत उतरली तर आधारभूत किंमतीने बाजरी खरेदी करणार आहे.

Economic Times 16-10-92 वरून

❖ ❖ ❖

# इंडिया शासनाला शेतकरीविरोधापासून परावृत्त करा

## आंतराष्ट्रीय नाणेनिधीच्या अध्यक्षांना विनंती

देशाचा परकीय चलनाचा साठा तुटपुंजा असल्याने शासन फार मोठ्या प्रमाणात धान्य आयात करण्याचा निर्णय घेणार नाही असे वाटत होते पण हे खोटे ठरले आणि त्यामुळे शेतकरी संघटनेने आयात गहू बंदरातच रोखण्यासाठी बंदरांची नाकेबंदी करण्याचा व मंत्र्यांना गावबंदी करण्याचा आंदोलनाचा कार्यक्रम जाहीर केला आहे.

इंडिया शासन खुल्या अर्थव्यवस्थेचा काही लाभ फक्त कारखानदारी क्षेत्राला देत असून शेतीक्षेत्राची जुन्याच, नेहरूवादी नीतीने पिळवणूक करीत आहे. या नेहरूवादी नीतीने शेतकऱ्यांचेच नव्हे तर पुऱ्या देशाचे वाटोळे केले असून देश दिवाळखोरीला पोहोचविला आहे.

ही नीती सोडून देण्याविषयी इंडियाच्या पंतप्रधानांना वेळोवेळी विनंती करूनसुद्धा इंडिया शासन मानत नाही; उलट, परकीय चलनात ऐपत नसताना चढ्या भावाने गव्हासारख्या शेतीमालाची आयात करून देशी शेतीमालाचे भाव पाडीत आहे. हे खुल्या अर्थव्यवस्थेच्या तत्त्वाच्या सर्वस्वी विरुद्ध आहे.

आंतरराष्ट्रीय नाणेनिधी खुल्या अर्थव्यवस्थेचा आग्रह धरते. शेतकरी संघटनाही गेली दहा वर्षे खुल्या अर्थव्यवस्थेचा पुरस्कार करीत आली आहे. आता कुठे, शेतकऱ्याला या खुल्या अर्थव्यवस्थेचा लाभ घेण्याची संधी मिळाली आहे. तर इंडिया शासन ती हिसकावून घेत आहे. म्हणून आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने आपले इंडिया शासनात असलेले वजन वापरून इंडिया शासनाला शेतकरी विरोधी कारवाया करण्यापासून परावृत्त करावे अशी विनंती शेतकरी संघटनेचे नेते श्री. शरद जोशी यांनी आंतराष्ट्रीय नाणेनिधीचे अध्यक्ष श्री. मिशेल कामडेसस यांना पत्र लिहून केली आहे.

# केंद्र शासनाने शेतकऱ्यांचा आशा धुळीस मिळविल्या

## शरद जोशींचे पंतप्रधानांना पत्र

श्री. शरद जोशी यांनी शेतकरी संघटनेच्या वतीने पंतप्रधान पी. व्ही. नरसिंहराव यांना पत्र लिहून शासनाने गव्हाची मोठ्या प्रमाणात आयात करून शेतकऱ्यांच्या खुल्या अर्थव्यवस्थेतून मिळू शकणाऱ्या लाभाची आशा फोल केल्याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. शासनाने, देशात विपुल प्रमाणात गहू पिकला असतांना परदेशी गव्हाची आयात करण्याचा विचार करू नये अशी विनंती करणाऱ्या तारा शेतकरी संघटनेने २७ फेब्रुवारी ९२ व २९ मे ९२ रोजी केल्या होत्या; त्या तारांना प्रतिसाद देण्याचे दूरच, पण साधी पोहोच देण्याचेही सौजन्य शासनाने दाखविले नाही याची आठवण देऊन श्री. शरद जोशींनी पत्रात लिहिले आहे,

देशातील गव्हाचे उत्पादन व पुरवठा यांच्या सध्याच्या स्थितीच्या संदर्भात गव्हाची आयात असमर्थनीय आहे;

देश परकीय चलनाच्या संकटात असतांना अनावश्यक आयात करण्यासाठी अनमोल परकीय चलन खर्च करणे अनुचित आहे;

महागाईचा गहू देशाच्या बाजारपेठेत ओतणे हे खुल्या अर्थव्यवस्थेच्या तत्त्वाच्या विरोधी आहे, शेतकऱ्यांच्या हिताविरोधी आहे आणि व्यापक पातळीवर, देशहिताचा घात करणारे आहे,

गहू उत्पादनात अग्रेसर असलेल्या विशेषतः, पंजाबच्या सध्याच्या परिस्थितीत शासनाची गहू आयातीची ही कृती, न पटण्यासारखी आहे.

खरे तर शेतकऱ्यांनी शासनाच्या खुल्या अर्थव्यवस्थेच्या हाकेला ओ देऊन, शासनाला आर्थिक संकटातून बाहेर काढण्यासाठी हरतऱ्हेने मदत करण्याची

जाहिर तयारी दाखविली होती. किंबहुना, म्हणूनच शेतकरी संघटनेने खतभाववाढीला विरोध केला नाही, शेतीवर आयकर लावण्याबाबतही पाठिंबा दिला.

पण शासनाने गव्हाच्या आयातीचा निर्णय घेऊन व तो अमलात आणून शेतकऱ्यांच्या आशा धुळीस मिळविल्या आहेत. गव्हाच्या आयातीच्या उदाहरणारने शासन जणू, आपण जुनीच नीती शेतकऱ्यांच्या बाबतीत चालू ठेवणार असल्याचे सुचवीत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना संघर्ष करण्याशिवाय पर्याय नाही.

अजूनही शासनाने आयात गहू बाजारपेठेत ओतण्याच्या निर्णयावर फेरविचार केला नाही तर शेतकरी संघटनेच्या कार्यकारिणीने ठरविलेली बंदरांची नाकेबंदी व मंत्र्यांना गावबंदी ही आंदोलने अटळ आहेत असा इशारा श्री. शरद जोशींनी या पत्रात दिला आहे. शेतीक्षेत्रासंबंधी निर्णय घेण्याआधी शासन व शेतकऱ्यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या राजकारण निरपेक्ष संघटना यांच्यामध्ये चर्चा होऊ शकेल असे व्यासपीठ नसल्याबद्दल श्री. शरद जोशींनी या पत्रात खेद व्यक्त केला आहे.

# इंडिया ३० लाख टन गव्हाची आयात करणार

इंडिया सरकारने अमेरिका, कॅनडा व ऑस्ट्रेलियातून एकूण तीस लाख टन गहू आयात करण्याचे करार केले असून मार्च-एप्रिल १९९३ पर्यंत हा गहू वेगवेगळ्या जहाजांतून इंडियाच्या बंदरांमध्ये येऊन पोहोचेल.

दरम्यान, जून १९९२ मध्ये कॅनडा बरोबर केलेल्या आयातकरारातील १० लाख टन व ऑगस्ट १९९२ मध्ये ऑस्ट्रेलियाबरोबर झालेल्या आयात करारातील ५ लाख टन गव्हापैकी ३ लाख १२ हजार टन गहू देशात येऊन पोहोचला आहे.

अमेरिकेकडून आयात केल्या जाणाऱ्या १ लाख ८३ हजार टन गव्हापैकी चार लाख टन गहू ऑक्टोबर ते डिसेंबर ९२ या काळात इंडियन बंदरात उतरेल तर उरलेला जानेवारी ९३ पर्यंत पोहोचेल.

आयात होणाऱ्या गव्हापैकी ६० टक्के गहू पांढरा तर ४० टक्के तांबडा असेल. रंगात फरक असला तरी सगळा गहू पौष्टिकतेत समृद्ध असणार आहे, असा शासनाचा दावा आहे.

### आयात होणाऱ्या गव्हाच्या किंमती

| देश | किंमत टनाला अमेरिकन डॉलरमध्ये | किंमत प्रतिक्किंटल ** रुपयामध्ये |
|---|---|---|
| अमेरिका * | ११०.५० | ३३१.५० |
| | ११२.५० | ३३७.५० |
| ऑस्ट्रेलिया | १३७.५० | ४१२.५० |
| | १३५.०० | ४०५.०० |
| कॅनडा | १४७.५० | ४४२.५० |

* अमेरिकेने प्रतीटन ३३.४५ डॉलर म्हणजे प्रतिक्किंटल १००.३५ रुपये सबसिडी दिली आहे.

** येथे अमेरिकन डॉलरची किंमत ३० रुपये धरली आहे.

वरील किंमती या त्या देशांत द्याव्या लागलेल्या किंमती आहेत. हा गहू हिंदुस्थानच्या किनाऱ्याला लागेपर्यंत वाहतूक वगैरे खर्च दर क्किंटलला २०० ते २२५ रुपये येईल.

Economic Times 15-10-92

### व्यापारी तूट तिप्पट झाली

गेल्या वर्षाच्या तुलनेने या वर्षी देशाच्या व्यापारी तुटीत प्रचंड वाढ झाली आहे. १९९१-९२ या वर्षात एप्रिल ते जुलै या चार महिन्यांच्या काळात व्यापारी तूट ७७ कोटी ६ लाख डॉलरची होती ती १९९१-९२ या वर्षाच्या त्याच चार महिन्यांच्या काळात २१२ कोटी १७ लाख डॉलर म्हणजे जवळजवळ तिप्पट झाली. याचे कारण, गेल्या वर्षापेक्षा यंदा आयातीत २२ टक्के वाढ झाली, तर निर्यातीत मात्र केवळ २ टक्के इतकीच वाढ झाली.

# आयात-निर्यात बंदी उठवा

## — जागतिक बँक

१९९२-९७ या काळासाठी आयात-निर्यात धोरण आखतांना इंडिया शासनाने आयात-निर्यात बंदीच्या मालाच्या यादीत काटछाट करून ती जास्तीत जास्त लहान करावी अशी सूचना जागतिक बँकेने केली असल्याचे समजते.

कापसाच्या निर्यातीवर गाठींची मर्यादा आहे. ज्या ज्या मालाच्या निर्यातीसंबंधी अशा प्रकारच्या मर्यादा आहेत त्या काढून टाकाव्यात, तसेच निर्यातीच्या किमान किंमतीची (Minimum Export Prices) पद्धतीही रद्द करावी अशीही सूचना जागतिक बँकेने केली आहे.

केंद्र शासनाच्या अर्थ व व्यापार या दोन्ही खात्यांमध्ये व आयात-निर्यात नियंत्रकांच्या कार्यालयात जागतिक बँकेच्या सूचनेची अंमलबजावणी करण्यासाठी आयात-निर्यात बंदीच्या यादीत काटछाट करण्याचे काम अत्यंत घाईगर्दीने चालू झाले आहे. काही अधिकारी मात्र जागतिक बँकेच्या या सूचनेला विरोध करीत आहेत. विशेषतः, आयातबंदीची यादी कमी करण्यास ते नाराज आहेत. कारण, शासनाने ही यादी आधीच कमी केली आहे व नियंत्रणेही कमी केली आहेत, याहून काटछाट कशी करणार?

शेतीउत्पादनाच्या निर्यातीसंबंधी एक अधिकारी म्हणाला की शासनाने काही शेतीमालांसाठी निर्यातीचा कोटा ठरवून दिलेला आहे. त्याचे कारण, देशातील त्या मालाची गरजेइतकी उपलब्धता राहावी. आणि किमान निर्यात किंमतीची पद्धती आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत इंडियन मालाला चांगली किंमत मिळावी या हेतूने अमलात आणली जाते.

काही झाले तरी ही यादी आता लहान होईल यात काही शंका नाही. मात्र, चालू वर्षी निर्यातीच्या मानाने आयात प्रचंड प्रमाणात वाढल्याने व्यापारी तूट भरमसाठ वाढली असल्याने आयातबंदीच्या यादीत फारशी काटछाट करण्यास शासन राजी नाही.

Economic Times 16-10-92 वरून

Posted at Market Yard, PSO, Pune 37.
On 23rd, October 1992

**SHETKARI SANGHATAK**
(Marathi Fortnightly)
Regd. No. 39926/83
October 21, 1992

**To**

**PNCW 281**
Licence to post without prepayment
**No. 87**

(पान ९ वरून)

चर्चेच्या शेवटी आंदोलन व बांधणीचा एक त्रिस्तरीय कार्यक्रम घोषित करण्यात आला.

१. देशातील शेतकऱ्यांच्या मागणीपेक्षा जास्त भावाने आयात होणारा गहू ज्या बंदरांत उतरेल त्या बंदरांची नाकेबंदी

२. उसाच्या भावावरील मर्यादा आणि ज्वारी व कापूस यांना रास्त भाव या बाबत महाराष्ट्र शासनाने ठोस निर्णय न घेतल्यास महाराष्ट्र व केंद्र शासनाच्या सर्व मंत्र्यांना गावबंदी करणे.

३. खुल्या अर्थव्यवस्थेच्या समर्थकांची आघाडी उभी करणे.

गावगन्ना पुढारी, जे खुल्या अर्थव्यवस्थेमुळे आजपर्यंतची लयलूट बंद होईल म्हणून बेचैन झाल्याने खताची भाववाढ, विजेची दरवाढ यासारख्या, शेतीमालाच्या रास्त भावाच्या संकल्पनेशी विसंगत विषयांवर शेतकऱ्यांना भडकावू पाहात आहेत त्यांना शेतकरी संघटनेचे विचाराधिष्ठित अस्तिव दाखवून देण्यासाठी आणि शेतकरी हा सूट सबसिडीची भीक मागणारा नसून मुक्त अर्थव्यवस्थेच्या स्पर्धेत उतरून घामाचे दाम मिळविण्याचा प्रयत्न करणारा उद्योजक आहे हे शासनासमोर मांडण्यासाठी हे आंदोलन करणे आवश्यक आहे म्हणून हे आंदोलन करावयाचे आहे. शेंडी आणि पारंबीची गाठ मारून झाली आहे. पुढील परीक्षा कार्यकर्त्यांची आणि शेतकऱ्यांची आहे. आयात गव्हाच्या आगमनाची निश्चित माहिती मिळाल्यावर बंदराच्या नाकेबंदीचा कार्यक्रम घोषित होणार आहे.

केल्हापूर जिल्ह्यातील वळीवडे येथे नेहरूनीतीच्या प्रतिमेचे दहन, २ ऑक्टोबर १९९२.

**कार्यकर्त्यांची भाषणे ऐकून हा मुलगा (डावीकडील) या विचारात तर हरवला नाही ना की, 'चाचा नेहरूंच्या धोरणाने इतका अनर्थ केला?'**

## शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते बबन जाधव यांचा पाय तुटला

परभणी येथे २ ऑक्टोबर १९९२ रोजी नेहरूनीती दहनाच्या कार्यक्रमासाठी वसमत तालुक्यातील बळेगाव येथील शेतकऱ्यांना घेऊन जाणाऱ्या ट्रॅक्टरचे पुढचे एक पुलावर फुटल्यामुळे ट्रॅक्टर ड्रायव्हरने ट्रॅक्टरवरून उडी मारली. ट्रॅक्टरमध्ये ५० कार्यकर्ते होते. त्यातील श्री. बबन जाधव यांनी ट्रॅक्टरच्या स्टिअरिंगचा ताबा घेऊन तो पुलावरून रस्त्यावर आणला. पण त्यांचा एक पाय मडगार्डमध्ये अडवल्याने ते ट्रॅक्टरवर संपूर्ण ताबा मिळवू शकले नाहीत. परिणामी, ट्रॅक्टर झाडावर आदळला व दहाजण गंभीर जखमी झाले. इतरांना किरकोळ जखमा झाल्या. श्री. बबन जाधव यांचा उजवा पाय मडगार्ड व झाड यांच्यामध्ये चिरडला गेल्याने दि. ६।१०।९२ रोजी तो गुडघ्याखालून तोडावा लागला. पाय गेल्याच्या दुःखापेक्षा आता संघटनेच्या कार्यक्रमात भाग घेता येईल किंवा नाही याचीच जास्त चिंता ते त्यांना भेटायला गेलेल्या कार्यकर्त्यांपुढे व्यक्त करीत होते.

**पाक्षिक शेतकरी संघटक**
**मालक — मोहन बिहारीलाल परदेशी**
**मुद्रण स्थळ — गणेश प्रिंटर्स,**
**६९३, बुधवार पेठ, पुणे - २.**

**संपादक, मुद्रक, प्रकाशक**
**सुरेशचंद्र म्हात्रे**
**फोन : द्वारा - चाकण २३५४, २४६८**

**६ व २१ तारखेला प्रसिद्ध होतो.**
**प्रकाशन स्थळ व पत्रव्यवहाराचा पत्ता**
**अंगारमळा, मु. पो. आंबेठाण (४१० ५०१)**
**ता. खेड, जि. पुणे.**